CNR No. MHNG090010702015

नि.दि.ख.क्र.– ११४/२०१५
गुलाब–वि–मोहम्मद नुर
निशाणी क्र.६५ च्या पुढे.

नाव – **गौरव गुलाबराव बावनकर.**

वय – **३६**

व्यवसाय – **नोकरी**

**वादी साक्षीदार क्र.०१ यांचा अधिकचा सरतपास शपथेवर श्री. ठावरे वकीलांमार्फत.**

**१७.** आता मला दस्त यादी **निशाणी क्र.०४/२** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदागोमुख यांनी तयार केलेला **गाव नकाशाची प्रमाणित प्रत** आहे. सदरचा दस्त पब्लीक डाक्यूमेंट असल्यामुळे त्यास **निशाणी क्र.९२** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.०४/९** वरील दस्त दाखविण्यात आला. तो माझे वडिलांनी पोलीस स्टेशन, केळवद येथे तक्रार अर्ज दाखल केला होता त्याची **कार्यालयीन प्रत** आहे. त्यावर संबंधीतांची पोच आहे. सदर दस्त **आर्टिकल 'अ'** वर दाखल आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.०४/८** वरील दस्त दाखविण्यात आला. तो मी ग्रामपंचायत नांदागोमुख येथे प्रतीवादी क्र.०२ यांचेविरुध्द तक्रार दाखल केलेली होती, त्यावरुन ग्रामपंचायत नांदागोमुख यांनी प्रतीवादी क्र.०२ ला नोटीस पाठवली होती त्याची **सत्यप्रत** आहे. सदरच्या दस्तास ओळखण्याकरिता त्यास **आर्टिकल 'क्यु'** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.०४/१३** वरील दस्त दाखविण्यात आला. तो पोलीस ठाणे, केळवद यांचेकडून माझे वडील व विजय यांना **आर्टिकल 'डी'** च्या अनुषंगाने कलम १४९ सी.आर.पी.सी. प्रमाणे पाठविलेल्या नोटीसची **मुळप्रत** आहे. ती मला माझ्या वडिलांनी दिली आहे, ती मी अभिलेखावर दाखल केली आहे. सदरच्या दस्तास ओळखण्याकरिता त्यास **आर्टिकल 'आर'** देण्यात येतो.

**१८.** आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/०५** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत नांदागोमुख यांनी दिनांक

२२/०८/२०१५ रोजी प्रतीवादी क्र.०१ यांनी बांधकामाची परवानगी घेतली नसल्याबाबत **प्रमाणपत्र** दिले, त्याची **मुळप्रत** आहे. *(प्रतीवादींचे वि. वकील श्री. कौटकर वकीलांनी आक्षेप नोंदविला की, दस्तास निशाणी अथवा आर्टिकल देण्यात येवू नये व सदरचा दस्त वादीने प्रमाणित प्रतीमध्ये अथवा माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त केला नाही अथवा सदर दस्त वादीच्या ताब्यामध्ये कोणत्या स्वरुपात आला ही बाब प्रमाणपत्रामध्ये नमुद करण्यात आली नाही तसेच सदर दस्त संबंधीत ग्रामपंचायतीचे कार्यालयीन लेटर हेडवर देण्यात आलेला नाही व त्यामुळे सदर दस्ताची सत्यता पडताळणी करणे आवश्यक आहे असा युक्तीवाद केला. त्यावर वादीचे वि. वकील श्री. ठावरे यांनी युक्तीवाद केला की, सदरचा दस्त ग्रामपंचायतीने त्यांचे जावक क्र.८११, दिनांक २२/०८/२०१५ रोजी त्यांचे दैनंदिन कामकाजाच्या अनुषंगाने दिला असल्याने व तो दस्त प्रतीवादी क्र.०१ च्या संदर्भात असल्याने व वादीने निशाणी क्र.७१ प्रमाणे दस्तानुसार संबंधीत ग्रामपंचायतीकडे अर्ज केला होता व उजर नोंदविला होता, त्या अनुषंगाने सदरचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर दस्त पब्लीक डॉक्यमेंट असून त्यास निशाणी देण्यात यावी. प्रतीवादींचे वि. वकील श्री. कौटकर वकीलांनी त्यावर आक्षेप नोंदविला की, वादीने निशाणी क्र.७१ नुसार प्रमाणत्राची मागणी केली असे नमुद केले नाही त्यामुळे सदर दस्तास निशाणी देण्यात येवू नये असा युक्तीवाद केला. सदरचा दस्त त्यावरील आक्षेप व जाबाब यांचे अवलोकन केले असता सदरचा दस्त हा वादी अथवा सदर साक्षीदारास प्राप्त झाल्याबाबत सदर दस्तामध्ये कुठेही नमुद करण्यात आले नाही. सदरच्या दस्तामधील मजकूर वादी साक्षीदारातर्फे सिध्द होत नाही. वादी सदर दस्त सिध्द करण्यासाठी अन्य योग्य साक्षीदाराचा पुरावा तपासून सदरचा दस्त निशाणीकृत करुन घेवू शकतो.)*

**१९.** आता मला दस्त यादी **निशाणी क्र.६४/११** वरील दस्त दाखविण्यात

आला. तो ग्रामपंचायत नांदागोमुख यांना मी, दिनांक १३/०२/२०२१ रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्याची **छायांकित प्रत** आहे व त्यावर संबंधीत ग्रामपंचायतीचे आवक क्र.७५/२०२१ व शिक्का नमुद करण्यात आलेला आहे.

**(सदर प्रकरणामध्ये वादीला अन्य दस्तऐवज दाखल करणे असल्याने अधिकचा सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्याची विनंती केली. सहमतीने पुढील तारीख देण्यात आली.)**

**सरतपास तहकूब.**

**वा.दा.ब.अ.क.क.का.दा.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**
**समक्ष**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**३ रे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**३ रे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**

दिनांक – १८/०४/२०२३.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- Mahesh L. Ingale